CNRNOMHSN090007902019

**नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१९ मधील नि.क्र.२० खालील आदेश**
**(अंकुश जाधव विरुध्द श्रीपती जाधव वगैरे.)**

(०१). प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

(०२). अर्ज व त्यावरील वादींनी दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

(०३). प्रतिवादींचे कथन असे आहे की, त्यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाले होते. परंतू प्रतिवादी हे आजारी असल्यामुळे त्यांना उपचारासाठी जावे लागत होते. त्यामुळे त्यांना वेळेत कैफियत देता आला नाही. त्यांनी कैफियत दाखल करण्यास जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. प्रतिवादीची कैफियत ही प्रस्तुत दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर लागण्याकरीता आवश्यक आहे. कैफियत अभिलेखावर न घेतल्यास प्रतिवादीचे अपरीमित असे नुकसान होणार आहे. यास्तव त्यांनी झालेला विलंब माफ करुन कैफियत अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

(०४). वादीने सदर अर्जांवर लेखी म्हणणे दाखल करुन, असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज मान्य नाही, कबूल नाही. सबब तो रद्द करण्यात यावा.

(०५). अभिलेख पाहिले. उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने विचारात घेवून अभिलेखाचे अवलोकनार्थ असे दिसते की, प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. मुळ दाव्याचे

स्वरुप पाहता, सदर दाव्यामध्ये गुणदोषावर न्यायनिर्णय पारीत होणेकरीता प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक ठरते. प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ केल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसते. याऊलट प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर आल्यास दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादीच्या कृत्यांमुळे दाव्यामध्ये विलंब झालेला आहे. सबब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब योग्य तो खर्चाचा आदेश पारीत करुन माफ करणे न्यायोचित होईल. यास्तव नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे झालेला विलंब माफ करुन प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्याकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**01.** प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**02.** प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर रक्कम रुपये १०००/-(रुपये एक हजार मात्र) च्या खर्चासह माफ करण्यात येत आहे.

**03.** प्रतिवादीने खर्चाची रक्कम आज अगर पूढील तारखेपर्यंत वादीला दयावयाची आहे.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE Date: 2026.03.07 17:16:44 +0530

**तासगांव**

(एस.वाय.वाकचौरे)

दिनांक:०७.०३.२०२६.

सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, तासगांव.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – ०७.०३.२०२६.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – ०७.०३.२०२६.

आदेश अपलोड दिनांक– ०७.०३.२०२६.